॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Phone: (02462) 215294

Fax : (02462) 215572

**EXAMINATION DEPARTMENT**

Website: srtmun.ac.in

e-mail: directorboee@srtmun.ac.in

संदर्भ :परीक्षा/२०२५-२६/ ५०८७

दिनांक : २८/०८/२०२५

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत कला, वाणिज्य व विज्ञान पदवी महाविद्यालये,
प्रस्तूत विद्यापीठ.

विषय :- **२ क्रेडीट व ४ क्रेडीट साठी प्रश्नपत्रीकेचे स्वरूपाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमासाठी ६०-४० असा पॅटर्न लागू करण्यांत आलेला असल्यामुळे २ क्रेडीट व ४ क्रेडीट साठी प्रश्नपत्रीकेचे स्वरूप निश्चीत करण्यासाठी आज दिनांक २८.०८.२०२५ रोजी मा.अधिष्ठाता हॉल मध्ये मा. प्र.कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली मा.अधिष्ठाते व अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांची बैठक सकाळी १०-३० वा. आयोजित करण्यांत आलेली होती. सदर बैठकीमध्ये खालील प्रमाणे प्रश्नपत्रीकेचे स्वरूप निश्चीत करण्यात आलेले आहे.

**२ क्रेडीटसाठी प्रश्नपत्रीकेचे स्वरूप :**

अ) पहिला प्रश्न १० गुणांचा अनिवार्य आहे. यामध्ये एकूण चार उपप्रश्न असतील प्रत्येक प्रश्नासाठी २.५ गुण आहेत. (संपूर्ण अभ्यासक्रमांवर आधारीत प्रश्न असणे आवश्यक आहे)

ब) प्रश्न क्रमांक २ ते ५ मधील कोणतेही २ प्रश्न सोडवीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नासाठी १० गुण आहेत.

**४ क्रेडीटसाठी प्रश्नपत्रीकेचे स्वरूप :**

अ) पहिला प्रश्न १५ गुणांचा अनिवार्य आहे. यामध्ये एकूण पाच उपप्रश्न असतील प्रत्येक प्रश्नासाठी ३ गुण आहेत. (संपूर्ण अभ्यासक्रमांवर आधारीत प्रश्न असणे आवश्यक आहे)

ब) प्रश्न क्रमांक २ ते ६ मधील कोणतेही ३ प्रश्न सोडवीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नासाठी १५ गुण आहेत.

क) प्रश्न क्रमांक ६ मध्ये उपप्रश्न रहाणार नाहीत.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून वरील प्रमाणे प्रश्नपत्रीकेचे स्वरूप प्रथम व द्वितीय या दोन्ही वर्षासाठी लागू करण्याचा निर्णय घेण्यांत आलेला आहे.** एन.ई.पी अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या ६०-४० प्रमाणे परीक्षा घेण्यांत येतील व प्राप्त गुणाचे रूपांतर ८०-२० मध्ये करून त्यांचा निकाल जाहिर करण्यांत येईल. तरी सर्व प्राश्नीकांनी प्रश्नसंच तयार करतांना वरील प्रमाणे नियमाचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच प्राचार्यांनी सर्व विद्यार्थी व संबंधीत शिक्षक यांच्या निदर्शनास आणून देवून अंमलबजावणीची कार्यवाही करावी.

**प्र.संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :

१) मा.प्रकुलगुरू महोदय, मा.प्रकुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

२) मा.अधिष्ठाता, सर्व मानव्यविद्याशाखा, आंतरविद्याशाखा प्रस्तुत विद्यापीठ.

३) मा. अध्यक्ष, सर्व अभ्यासमंडळे मानव्यविद्याशाखा, आंतरविद्याशाखा यांना देवून कळविण्यात येते कि सर्व संबंधीताच्या निदर्शनास आणून द्यावे.